पुण्य नगरी

# गुलटेकडीमध्ये पणन मंडळाचा आंबा महोत्सव उद्यापासून सुरू

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दर वर्षी उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेंतर्गत आंबा महोत्सवास सोमवारपासून (दि. १ एप्रिल) सुरुवात होणार आहे. गुलटेकडी, मार्केटयार्ड पुणे येथे आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

या वर्षी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे २३ वे वर्ष आहे. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी सांगितले.

चालू वर्षी आंबा महोत्सव महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे सहकार्याने करण्यात येणार आहे. महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील, तसेच राज्यातील केशर आंबा उत्पादकांबरोबरच जिल्हा परिषदेकडील ग्रामीण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही समावेश असणार आहे. या वेळेस सुमारे १२५ आंबा उत्पादकांनी नोंदणी केली. उत्पादकांमार्फत उत्तम प्रतीचा आंबा ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. या वेळेस हवामान चांगले असल्याने आंब्याची आवकही मोठ्या प्रमाणात राहील, अशी माहिती सहभागी आंबा उत्पादकांनी दिली.

> महोत्सव हा ग्राहकांच्या सोईसाठी गुलटेकडी, मार्केट यार्ड येथील पीएमटी बस डेपोशेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत सुरू करण्यात येणार आहे. या वेळेस सुमारे ६० स्टॉलमधून ७५ उत्पादक हापूस, केशर, पायरी, बिटकी (लहान आंबा) आंबा विक्री करणार आहेत. तसेच १० बचत गटांच्या स्टॉलमधून विविध प्रक्रियायुक्त उत्पादने खरेदीची संधी लाभणार आहे. आंबा महोत्सव १ एप्रिल ते ३१ मेदरम्यान सुरू राहणार आहे. कोकणातील उच्च प्रतीच्या हापूस आंब्याचा, तसेच राज्याच्या विविध भागांतील केशर आंब्यांचा लाभ ग्राहकांनी घ्यावा.
>
> – **संजय कदम,** कार्यकारी संचालक, पणन मंडळ

> पुण्यातील पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात मागील सहा वर्षांपासून आम्ही सहभागी होत आहे. दलालांऐवजी थेट ग्राहकांना हापूस आंबा विक्रीचे कौशल्य अवगत केले आहे. पुण्याशिवाय इतरही ठिकाणी हापूस आंबा विक्री करून ग्राहकांना खात्री देत आहोत. आवक २० एप्रिलनंतर वाढेल आणि दर सामान्यांच्या आटोक्यात येतील. हापूस आंबा सद्यःस्थितीत ८००-१२०० रुपये प्रति डझन भाव आहे.
>
> – **अमित शिर्सेकर,** आंबा बागायतदार, राजापूर (जि. रत्नागिरी)

Smart Pune Edition
Mar 31, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# यंदा अनुकूल हवामानामुळे हापूस मुबलक

## १ एप्रिलपासून पणन मंडळाचा आंबा महोत्सव : २० एप्रिलनंतर आवक वाढण्यास होणार सुरुवात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील अनुकूल हवामानामुळे यंदा कोकणातील हापूस आंब्यांचे पीक चांगले अपेक्षित असून, २० एप्रिलनंतर आवक वाढण्यास सुरुवात होईल. मे महिन्यात आवक दुप्पट वाढून दर आवाक्यात येण्याची अपेक्षा आहे. राज्य कृषी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाला १ एप्रिलपासून मार्केट यार्डात सुरुवात होत असून, 'शेतकरी ते ग्राहक' अशी थेट आंबा विक्री सुरू होईल. कोकणातील उच्च प्रतीच्या हापूस आंब्यासह राज्याच्या विविध भागांतील केशर आंब्याची खरेदी करण्याची संधी ग्राहकांना उपलब्ध होत आहे.

पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने मार्केट यार्डातील पीएमटी बस डेपोशेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत आंबा महोत्सव होत आहे. आंबा महोत्सवाचे उद्घाटन १ एप्रिलला होऊन तो ३१ मेपर्यंत चालू राहील, अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी



संचालक संजय कदम यांनी दिली.

कदम म्हणाले की, महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील तसेच राज्यातील केशर आंबा उत्पादकांचा सहभाग आहे. शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, हा उद्देश आहे. महोत्सवासाठी १२५ आंबा उत्पादकांनी नोंदणी केली असून, सुमारे ६० स्टॉलमधून ९५ उत्पादक हापूस, केशर, पायरी, बिटकी (लहान आंबा) आंबा विक्री करतील. तसेच, १० बचत गटांच्या स्टॉलमधून विविध प्रक्रियायुक्त उत्पादने खरेदीची संधीही ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### दलालांऐवजी थेट ग्राहकांना हापूस विक्रीचे कौशल्य प्राप्त

पुण्यात होणाऱ्या पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात गेली सहा वर्षे आम्ही सहभागी होत असून, दलालांऐवजी थेट ग्राहकांना हापूस आंबा विक्रीचे कौशल्य आम्हाला मिळाल्याची माहिती सागवे शिरसे (ता. राजापूर, जि. रत्नागिरी) येथील आंबा बागायतदार शेतकरी अमित शिर्सेकर यांनी दिली. शिर्सेकर म्हणाले की, पुण्याशिवाय आम्ही इतरत्रही स्वतःच विक्री करून ग्राहकांना खात्रीशीर आंबा उपलब्ध करून देत आहोत. कोकणात यंदा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये आंबा मोहर तुलनेने कमी होता. मात्र, डिसेंबर ते जानेवारीमध्ये झालेली मोहरधारणा उत्तम असून, आंबा उत्पादन गतवर्षापेक्षा मुबलक येईल. रत्नागिरी, सिंधुदुर्गमधील शेतकऱ्यांकडे ग्राहकांची आंब्यासाठी सध्या थेट मागणी सुरू आहे. सध्या उच्च प्रतीच्या हापूसचा दर प्रतिडझनाला ८०० ते १२०० रुपये आहे. २० एप्रिलनंतर आंबा आवक वाढण्यास सुरुवात होईल आणि एप्रिलअखेर ती दुप्पट होऊन दर खाली येऊ शकतात.

My Pune Edition
Mar 30, 2024 Page No. 03
newspaper.pudhari.co.in

Agrowon, Dt. 30/03/2024

# ‘पणन’चा आंबा महोत्सव सोमवारपासून होणार सुरू

## पुणेकरांना मिळणार अस्सल हापूस, केसर आंबा

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : ‘‘हापूस आंब्याचा हंगाम बहरात आला असताना ग्राहकांना अस्सल कोकणचा हापूस रास्त दरात उपलब्ध होण्यासाठी उत्पादक ते ग्राहक या संकल्पनेवरील राज्य कृषी पणन मंडळाच्या २३ व्या हापूस आंबा महोत्सवाला सोमवार (ता. १)पासून प्रारंभ होणार आहे,’’ अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

या वर्षीचा आंबा महोत्सव राज्य कृषी पणन मंडळासह पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार्याने आयोजिला आहे. महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांतील तसेच राज्यातील केसर आंबा उपलब्ध असेल. जिल्हा परिषदेकडील ग्रामीण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही सामावेश असेल. हा महोत्सव मार्केट यार्ड येथील पीएमटी बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत होईल. कोकण हापूससह मराठवाड्यातील केसर आंबादेखील उपलब्ध असेल. तसेच १० बचत गटांच्या स्टॉलमधून प्रक्रियायुक्त उत्पादने खरेदीची संधी लाभेल. हा महोत्सव ३१ मेपर्यंत सुरू राहील.

### यंदा मुबलक हापूस

‘‘गेल्या वर्षी हवामान बदल, अवकाळी पाऊस आदी विविध कारणांनी आंब्याचे उत्पादन घटले होते. तर ऐन अक्षय तृतीयेला आंबा टंचाई निर्माण झाली होती. मात्र या वर्षी हवामानाने साथ दिल्याने आंबा मुबलक उपलब्ध असल्याने ग्राहकांनी अधिकाधिक आंबा खरेदी करावा,’’ असे आवाहन श्री. कदम यांनी केले.

Agrowon, Dt. 29/03/2024

# इतर राज्यांतील आंबा 'हापूस' नावाने विकल्यास दंड

## पुणे आणि मुंबई बाजार समितीने काढले परिपत्रक

रत्नागिरी : दरवर्षी आंबा हंगामात कोकणातील हापूस आंब्यासोबत इतर राज्यांतील आंबादेखील मोठ्या प्रमाणात दाखल होतो. इतर राज्यातून आलेल्या आंब्याची 'हापूस' या नावाने विक्री केल्याच्या प्रकाराला आळा घालण्यासाठी पुणे आणि मुंबई बाजार समितीने परिपत्रक काढले आहे. इतर राज्यातील आंबा 'हापूस' नावाने विकल्यास संबंधित व्यापाऱ्याचा आंबा जप्त करून दंड, परवाना निलंबित किंवा परवाना रद्द करण्याची कारवाईदेखील करण्यात येणार आहे.

बाजार समित्यांमध्ये कोकणचा राजा, अर्थात हापूस आंब्याची देवगड, रत्नागिरी येथून आवक होते. त्या शिवाय केरळ, गुजरात, कर्नाटक यांसह इतर राज्यांतून आंबा येतो; मात्र इतर राज्यांतील आणि कोकणातील आंब्याच्या चवीत, सालीमध्ये फरक आहे. कोकणातील हापूस रसाळ, चवीस चांगला असतो. त्यामुळे सर्वाधिक मागणी असते. म्हणूनच या आंब्याच्या किमतीही जास्त असतात. याचा फायदा घेत व्यापारी, विक्रेते ग्राहकांची फसवणूक करतात. आंब्यांची अदलाबदल करून विक्री करतात. मागील वर्षीच्या हंगामाच्या सुरुवातीला पुणे बाजार समितीत कर्नाटक, केरळ येथून आलेला आंबा हा 'कोकण हापूस' या नावाने लेबल लावून विक्री करतानाचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे पणन संचालकांनी याबाबत तपासणी करून कारवाईचे आदेश दिले होते. परराज्यांतील आंबा हा महाराष्ट्रात उत्पादित झालेला आहे किंवा 'कोकण हापूस' आहे, असे भासवून विक्री करणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे याबाबत कारवाईचे आदेश बाजार समितीने दिलेले आहेत.



> **'हापूस'च्या नावाने इतर राज्यांतून आलेल्या आंब्याची विक्री करणाऱ्यांना आळा घालण्यासाठी बाजार समितीमार्फत परिपत्रक काढण्यात आले आहे. अशा प्रकारामुळे हापूसच्या दर्जावर परिणाम होत असून दरही खाली येतो.**
>
> **– संजय पानसरे**, संचालक, बाजार समिती, वाशी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# वजनाबाबत तक्रारी आल्यास कारवाई

## पणन संचालक विकास रसाळ यांच्या जिल्हा उपनिबंधकांना सूचना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक वजनकाटे बसवावेत, अशा सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. तसेच, अशा वजनकाट्यांबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्यास संबंधित बाजार समित्यांवर कायदा व नियमातील तरतुदीनुसार योग्य कारवाई करण्याच्या परिपत्रकीय सूचना पणन संचालक विकास रसाळ यांनी सर्व जिल्हा उपनिबंधकांना दिल्या आहेत. शेतकऱ्यांच्या शेतमाल वजनाबाबत कोणत्याही तक्रारी येणार नाहीत यासाठी दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७ नुसार बाजार समितीने शेतमाल वजनमाप करण्यासाठी वजनकाटे बसविले पाहिजेत आणि ते योग्य त्या चालू स्थितीत ठेवले पाहिजेत. खरेदीदार, विक्रेतेदारास बाजार समितीने ठरविलेले शुल्क देऊन आपल्या शेतमालाचे वजनमाप करता येईल.

- **पर्यायी बाजार व्यवस्थेच्या अभ्यास गटाने सुचविला होता चोख वजनाचा मुद्दा**
- **अत्याधुनिक व अधिकृत इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर शेतमाल वजनमाप करा**
- **शेतमाल वजन करण्याच्या दरापेक्षा शेतकऱ्यांना जादा दर आकारणी नको**
- **वजनाची पावती बाजार समितीच्या दप्तरी ठेवून सेस पडताळणीस फायदा**
- **शेतमाल वजन तफावतीने शेतकऱ्यांसह बाजार समिती व शासनाचेही नुकसान**

अचूक शेतमाल वजनमापासाठी पणन संचालनालय, शासन, शेतकरी आणि शेतकरी संघटना आग्रही आहेत. शासनाने पर्यायी बाजार व्यवस्थेबाबत नेमलेल्या अभ्यास गटाच्या अहवालातही शेतमालाचे वजनमाप चोख असण्याचा मुद्दा मांडला होता. त्या पार्श्वभूमीवर पणनचे १५ मार्चचे परिपत्रक महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

बाजार समित्यांमध्ये काही वेळा तीन-चार शेतकऱ्यांचा एकत्रित शेतमाल एका वाहनातून आणला जातो आणि अशा वेळेस अधिकृत वजनकाट्यावर वजन न करता व्यापाऱ्यांकडे असलेल्या छोट्या वजनकाट्यावर वजन करण्यास सांगण्यात येते. बाहेरील किंवा व्यापाऱ्यांच्या वजनकाट्यावर वजन केल्यामुळे शेतमालाच्या वजनात तफावत आढळल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयास प्राप्त होत आहेत. शिवाय वजन तफावतीमुळे बाजार समितीची बाजार फी व शासनाचे देखभाल फीचेही नुकसान होते.

### कन्झ्युमर्स फेडरेशनला हवी जागा

मुंबई येथील महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशनला इलेक्ट्रॉनिक वजनकाटा बसविण्यासाठी दोन हजार चौरस फूट जागा सुमारे ३० वर्षे कालावधीसाठी भाडेकरारावर बांधा-वापरा या तत्त्वावर काही बाजार समित्यांनी उपलब्ध करून दिली आहे. त्यांनी बसविलेल्या वजनकाट्यावर केलेल्या शेतमाल वजनामुळे शेतकरी व अन्य घटकांची सोय होऊन वजनमापाबाबतच्या तक्रारी कमी झाल्या आहेत.

Agrowon, Dt. 27/03/2024

# सरकार करणार पाच लाख टन कांदा खरेदी

**नवी दिल्ली :** कांदा निर्यातीवरील बंदी वाढवल्यामुळे किमती घसरण्याची शक्यता लक्षात घेता सरकारने कांदा खरेदीचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता येत्या दोन-तीन दिवसांत ५ लाख टन रब्बी कांद्याची खरेदी सुरू करणार असल्याचे मंगळवारी सरकारकडून सांगण्यात आले.



कांदा निर्यातीवर ३१ मार्चपर्यंत बंदी घालण्यात आली होती. ही बंदी पुढील आदेशापर्यंत वाढवण्यात आल्याचे गत आठवड्यात वाणिज्य मंत्रालयाने सांगितले होते. निर्यातबंदी वाढल्यामुळे कांद्याचे दर कोसळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल. कांद्याचे भाव पडून शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेता सरकारने कांदा खरेदीचा निर्णय घेतल्याचे वाणिज्य मंत्रालयाच्या ग्राहक व्यवहार विभागाचे सचिव रोहितकुमार ▶▶ पान ४ वर...

सरकार करणार पाच लाख टन कांदा खरेदी

सिंग यांनी सांगितले. शेतकऱ्यांना आम्ही आश्वस्त करू इच्छितो की, त्यांना अडचणीत येऊ दिले जाणार नाही. आम्ही बफर स्टॉक ठेवण्यासाठी पुढील दोन-तीन दिवसांत रब्बी हंगामातील पाच लाख टन कांदा खरेदीला सुरुवात करणार आहोत, असे रोहितकुमार सिंग म्हणाले. कांदा निर्यातबंदीचा व्यापाऱ्यांवर परिणाम होत असून शेतकऱ्यांना कोणताही फटका बसलेला नाही. कारण महाराष्ट्रात बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर सध्या १३ ते १५ रुपये प्रतिकिलो आहेत. गतवर्षीच्या तुलनेत हे जवळपास दुप्पट आहेत, असा दावाही त्यांनी केला. सरकार सहसा बाजार समित्यांमधील प्रचलित दरांवर बफर स्टॉकसाठी कांदा खरेदी करत असते. कांद्याच्या किमती उत्पादन खर्चापेक्षा खाली आल्या तर सरकार सुनिश्चित करते की, शेतकऱ्यांना किमान उत्पादन खर्च तरी मिळावा, असे केंद्रीय सचिवांनी सांगितले. २०२३-२४ मध्ये सरकारने बफर स्टॉकसाठी १७ रुपये प्रतिकिलो सरासरी दराने सुमारे ६.४ लाख टन कांदा खरेदी केला होता. गेल्या वर्षी कांदा खरेदी जून महिन्यात करण्यात आली होती. यंदा मात्र ती लवकर करण्यात येत असल्याचे विभागाच्या विशेष कार्यकारी अधिकारी निधी खरे यांनी सांगितले. नाफेड आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) यांच्यामार्फत सरकार खरेदी करत असते.

Agrowon, Dt. 24/03/2024

# अभ्यास गटाकडून पणन कायद्यांच्याच शिफारशी

## बाजार समिती लेखापरिक्षणाची पुनर्शिफारस



गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : बाजार समिती अभ्यास गटाने पणन कायद्यांच्याच अंमलबजावणीच्या शिफारशी शासनाला सादर केल्या आहेत. तसेच बाजार समित्यांच्या लेखापरिक्षणावर कठोर कारवाई होत नसल्याचे वास्तव असताना, लेखापरिक्षण करण्याची पुनर्शिफारस अभ्यास गटाने केली आहे. याबाबतचा अहवाल समितीने नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला आहे. **पान ४ वर »**

> **आजी माजी पणन संचालकांनी बाजार समित्यांवर कायदेशीर वचक ठेवला नाही. त्यांनीच आता सेवानिवृत्तीनंतर लेखापरिक्षणाची मागणी करणे योग्य नाही. या समितीबाबत सरकारचा हेतू शुद्ध दिसत नाही. शेतकरी संघटनांच्या नेत्यांना यामध्ये स्थान देण्याची गरज होती. सर्व शेतीमालावरील नियंत्रण काढा, आयात निर्यातीवरील निर्बंध काढा अशी आमची मूळ मागणी आहे. या समितीच्या बैठकांवरील खर्च हा सरकारी पैशांचा अपव्यय आहे.**
>
> – **रघुनाथदादा पाटील**, शेतकरी संघटनांच्या राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष

### ...या आहेत शिफारशी

- किमान आधारभूत किमतीनुसार शेतीमाल खरेदीसाठी यंत्रणा उभारणे
- अन्नधान्य सुकविण्यासाठी बाजार समित्यांमध्ये यंत्रणा निर्माण करणे
- त्यासाठीच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करणे
- खासगी बाजारांसाठी आदर्श बाजार आराखडा तयार करणे
- खुल्या लिलाव पद्धतीचा अवलंब करणे
- खासगी बाजारांची नियमित तपासणी व लेखापरिक्षण करणे
- बाजार समितीत आलेल्या शेतीमालाचा विमा उतरवणे
- 'ई-नाम'शी खासगी बाजार जोडणे
- पणन विभागाचे बळकटीकरण
- शेतकरी ते उपभोक्ता ग्राहक अशी मूल्यवर्धित साखळी निर्माण करणे

Agrowon, Dt. 24/03/2024

# अभ्यास गटाकडून पणन कायद्यांच्याच शिफारशी

» पान १ वरून

पारंपरिक शेतीमाल विक्री व्यवस्थेतील शेतकऱ्यांची होणारी लूट बंद करण्याबरोबरच, पारदर्शकपणे व्यवहारांसाठी पणन १९६३ आणि १९६७ मधील पणन कायद्यांचीच कठोर अंमलबजावणी केली, तरी बाजार व्यवस्था सक्षम होईल. अशी परिस्थिती असताना बाजार समिती अभ्यास गटाने पणन कायद्यांचीच अंमलबजावणीच्या शिफारशी शासनाला सादर केल्या आहेत.

कृषी पणन व्यवस्थेमध्ये निर्माण झालेली एकाधिकारशाही व कुंठितता दूर करण्यासाठी केंद्र शासनाने सुचविल्यानुसार २००५ नंतर राज्याच्या अधिनियमात सुधारणा करुन पर्यायी बाजार व्यवस्था निर्माण करण्यात आली. अधिनियमातील या सुधारणांमुळे शेतकऱ्यांना शेतीमाल विक्रीसाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध झाल्याने स्पर्धा निर्माण होऊन शेतीमालास अधिकचे दर मिळावेत असे अपेक्षित होते. या बाबींचा विचार करून पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी राज्यातील प्रचलित बाजार व्यवस्थेत शेतकरी हा केंद्र बिंदू मानून सुधारणा करण्यासाठी अभ्यासगटाची नियुक्ती केली होती.

माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यास गटात पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, माजी पणन संचालक सुनील पवार, पणन सहसचिव सुग्रीव धपाटे, बाजार समिती संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर कुलकर्णी, देविदास पालोदकर, माजी कृषी संचालक जयवंत महल्ले, उदय देवळाणकर, शेतकरी प्रतिनिधी रमेश शिंदे पूना मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष राजेंद्र बाठिया, अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर कॉमर्स इंडस्ट्री ॲण्ड ॲग्री. व्यापारी प्रतिनिधी ललित गांधी, शासनमान्य खासगी बाजार फेडरेशन प्रतिनिधी ज्ञानेश्वर भामरे, पणन सहसंचालक दीपक शिंदे यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश होता.

### ...असा केला अभ्यास

अभ्यासगटाने बाजार समितीच्या सद्यःस्थितीतील कारभाराची माहिती संकलित करण्यासाठी खासगी बाजार, थेट पणन संकलन केंद्र आणि पुणे, मुंबई, संगमनेर, नाशिक आणि नागपूर या बाजार समित्यांना प्रातिनिधिक स्वरूपात भेटी दिल्या आणि तेथील सर्व संबंधित बाजार घटकांशी विचारविनिमय करून त्यांच्या अडी-अडचणी समजावून घेतल्या. तसेच बाजार व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्याकडून आलेली निवेदने स्वीकारली व सूचना समक्ष ऐकून घेतल्या. त्या आधारे कायदेशीर तरतुदी, प्रचलित पद्धती, क्षेत्रीय तपासणी अहवाल, विविध तज्ज्ञांशी चर्चा, बाजार व्यवस्थेमधील सर्व घटकांकडून आलेल्या सूचनांचा अभ्यास करून अहवाल सादर केला आहे.

## दृष्टिक्षेपात शेतीमाल पणन व्यवस्था

- **राज्यातील बाजार समित्यांची संख्या**-३०६
- **उपबाजार**-६२१
- **खासगी बाजार**-८४
- **थेट पणन परवानाधारक**-१ हजार ४९९

जागतिक कृषी पणन व्यवस्थेमध्ये होणारे वेगवान बदल, ऑनलाइन व्यापाराची आव्हाने, शेतीमाल निर्यातीचे सातत्याने बदलणारे निकष या बाबींना तोंड देण्यासाठी राज्यातील पणन व्यवस्थेने केवळ शेतमाल खरेदी-विक्री पुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे संकलन करण्यापासून ते कृषिमाल पुरवठा व प्रक्रिया साखळी विकसित करण्याबाबत पुढाकार घेणे आवश्यक आहे. यासाठी अभ्यास गटाची नियुक्ती केली होती. त्याचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर केला आहे.

– **अब्दुल सत्तार**, पणनमंत्री

पुण्य नगरी

# खासगी बाजार 'ई-नाम'शी जोडणार

**बाजार समित्यांचा अहवाल सरकारकडे सादर**

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि पर्यायी बाजार व्यवस्था यांचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांच्या समितीने राज्य सरकारला अहवाल सादर केला आहे. यामध्ये अनेक शिफारशी केल्या असून, खासगी बाजार 'ई-नाम'शी जोडण्यात यावा,अशी मागणी केली आहे. त्यामुळे बाजार समित्यांमध्ये बदल करण्यात येतील, अशी अपेक्षा आहे.

राज्यातील प्रचलित बाजार व्यवस्थेत शेतकरी हा केंद्रबिंदू मानून सुधारणा करण्यासाठी पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी माजी कृषी आयुक्त दांगट यांच्या अभ्यासगटाची नियुक्ती केली होती. त्या समितीत १४ सदस्यांचा समावेश होता. त्यात माजी पणन संचालक सुनील पवार, पणन विभागाचे सहसचिव सुग्रीव धपाटे, पणन संचालक विकास रसाळ, तसेच सहसंचालक दीपक शिंदे सदस्य होते.

eNAM

Uttam Fasal Uttam Enaam

NATIONAL AGRICULTURE MARKET

राज्य सरकारने निश्चित केलेल्या कार्यकक्षेनुसार अभ्यासगटाने राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि पर्यायी व्यवस्थांची वस्तुस्थितीदर्शक माहिती संकलित केली. पुणे, मुंबई, संगमनेर, नाशिक आणि नागपूर येथील बाजार समित्यांना भेटी दिल्या. खासगी बाजार, पणन संकलन केंद्रांना भेटी दिल्या. तेथील बाजार घटकांशी विचारविनिमय करून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या.

बाजारव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्याकडून आलेली निवेदने, सूचना स्वीकारल्या. त्या आधारे कायदेशीर तरतुदी, प्रचलित पद्धती, क्षेत्रीय तपासणी अहवाल, विविध तज्ज्ञांशी चर्चा, बाजारव्यवस्थेमधील सर्व घटकांकडून आलेल्या सूचनांवर विचारमंथन करून अहवाल तयार केला आहे.

किमान आधारभूत किमतीप्रमाणे खरेदीसाठी, तसेच अन्नधान्य सुकविण्यासाठी बाजार समित्यांमध्ये आवश्यक ती यंत्रणा निर्माण करावी. खासगी बाजारांसाठी आदर्श बाजार आराखडा तयार करून पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात. शेतमालास चांगला दर मिळावा यासाठी खुल्या लिलाव पद्धती अमलात आणावी. खासगी बाजारांची नियमित तपासणी व लेखापरीक्षण करावे. 'ई-नाम' शी खासगी बाजार जोडणे. बाजार समिती आवारातील विक्रीस आलेल्या शेतमालाचा विमा उतरवणे या शिफारशी अभ्यासगटाने केल्या आहेत.

Pune Edition
Mar 19, 2024 Page No. 05
Powered by: erelego.com

पुढारी

# शेतमालासाठी खुले लिलाव, स्पर्धा, एमएसपीचे हवे कवच

- बाजार नियमातील विसंगती दूर करून एकसमानता आणल्यास फायदा
- पर्यायी बाजार व्यवस्थेबाबतच्या अभ्यास गटाचा अहवाल शासनास सादर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**शेतमालाचे सरसकट खुल्या लिलावाद्वारे विक्री, चोख वजनमाप, माल विक्रीची २४ तासांच्या आत रक्कम मिळण्याबरोबरच किमान आधारभूत किमतीने (एमएसपी) शेतमालाच्या खरेदीची यशस्वी अंमलबजावणी या त्रिसूत्रीचे कवच मिळाल्यास शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने फायदा होण्याची अपेक्षा आहे.**



**पर्यायी बाजार व्यवस्थेबाबतच्या अभ्यास गटाचा अहवाल प्रकाशन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, अभ्यास गट समितीचे अध्यक्ष उमाकांत दांगट, सुनील पवार व मान्यवर.**

राज्यातील प्रचलित बाजार व्यवस्थेत शेतकरी हा केंद्रबिंदू मानून कृषी उत्पन्न बाजार समित्या व पर्यायी बाजार व्यवस्थेच्या अभ्यासासाठी नेमलेल्या समितीने आपल्या शिफारशींसह अहवाल शासनाला दाखल केला आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि खासगी बाजारांमधील नियमातील विसंगती दूर करून एकसमानता आणल्यास होणाऱ्या स्पर्धेतून मालविक्रीच्या जादा दराचा पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध होईल, असेही त्यात नमूद केले आहे.

शासनाने राज्याचे माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली शेतमाल बाजार व्यवस्थेशीसंबंधित सर्व घटकांच्या एकूण १४ सदस्यांची सर्वसमावेशक असा अभ्यास गट गठित केला होता. त्यामध्ये सेवानिवृत्त पणन संचालक सुनील पवार, पणन सहसचिव सुग्रीव धपाटे, पणन संचालक विकास रसाळ, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व अन्य सदस्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, पणनमंत्री अब्दुल सत्तार, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मंत्रिमंडळातील अन्य मंत्र्यांच्या उपस्थितीत शासनाला ११ मार्च रोजी मंत्रालयात सादर केला आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील तरतुदीनुसार शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी राज्यात कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली. सद्य:स्थितीत राज्यात एकूण ३०६ बाजार समित्या व ६२१ उपबाजार, तसेच ८४ खासगी बाजार कार्यरत असून, थेट पणनचे १ हजार ४९९ परवाने देण्यात आले आहेत.

## ▪ अभ्यास गटाने केलेल्या महत्त्वपूर्ण शिफारशी

- अन्नधान्य सुकविण्यासाठी बाजार समित्यांमध्ये हवी आवश्यक यंत्रणा
- खासगी बाजार ई-नामशी जोडणे व त्यांचा आदर्श बाजार आराखडा करावा
- पायाभूत सुविधा निर्माण करून शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळावा
- खासगी बाजारांची नियमित तपासणी व लेखापरीक्षण करावे
- बाजार आवारात विक्रीस आलेल्या शेतमालाचा विमा उतरवावा
- पणन विभागाच्या बळकटीकरणासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद हवी

## शेतकरी ते ग्राहकांची मूल्यसाखळी हवी

शेतकरी व उपभोक्ता ग्राहकांची मूल्यवर्धित साखळी निर्माण करण्यावर भर द्यावा. बाजार व्यवस्थेचा भविष्यकालीन वेध घेऊन कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आलेल्या शेतमालावर प्राथमिक प्रक्रिया करण्यासाठी सोयी-सुविधा वाढविण्याची गरज आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या, गटांना थेट पणन परवान्यांची संख्या वाढवून त्यांचे बळकटीकरण करावे. किमान आधारभूत किमतीने (एमएसपी) योग्य व सरासरी गुणवत्तेचा तथा एफएक्यू दर्जाच्या शेतमालाच्या खरेदीसाठी यंत्रणा कार्यरत केल्यास शेतमालाचे भाव पाडण्याचे प्रकार थांबतील. शेतमाल वाळवण यंत्रांची सुविधा समित्यांमध्ये द्यावी.


देशोन्नती

दि. 13/03/2024

# वसमतमध्ये हळदीला विक्रमी २१६०० रुपये दर

## मार्केट यार्डात ६ हजार हळद कट्ट्यांची झाली आवक

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वसमत** ■ येथे मंगळवारी हळदीला तब्बल २१ हजार ६०० रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला. हळदीचे दर स्थिर असताना अचानक हळदीच्या भावाने उसळी घेतली आहे. हळदीचे दर बाजारात वाढत असल्याने वसमत मार्केट यार्डमध्ये हळदीची आवक वाढली आहे. मंगळवारी सहा हजार हळद कट्ट्यांची आवक झाली होती.

वसमत तालुका हळद उत्पादनात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. तर वसमत येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मराठवाड्यात सर्वाधीक हळदीची खरेदी विक्री व उलाढाल होत असते. वसमत तालुक्यात उच्च दर्जाची हळद उत्पादित होत असल्याने महाराष्ट्रातील खरेदीदारांसह पर प्रांतातील खरेदीदारही वसमत बाजारात हळद खरेदीसाठी येत असतात. यावर्षी हळदीला चांगला दर मिळाला आहे वसमत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या लिलाव कक्षात हळदीचे बीट होते. या बिटात हळद खरेदी करण्यासाठी बाहेर गावाहूनही खरेदीदार येत आहेत. त्यामुळे हळदीला चांगला दर मिळत आहे. गेल्या काही दिवसापासून हळदीचे दर स्थिर होते. दहा हजार ते पंधरा हजार रुपये पर्यंत हळद विकल्या जात होती. मंगळवारी हळदीचे बीट पुकारण्यात आले. यावेळी तब्बल १५ हजाराच्या पुढे हळद विकल्या गेली. सरासरी तर १६ हजार ५०० रुपये दर मिळाला. १६ हजार ते २१ हजार ६०० रुपये दरापर्यंत हळदीचे दर राहिले. मंगळवारी सर्वाधिक दर २१ हजार ६०० रुपये मिळाला. गेल्या अनेक दिवसांमधील हा विक्रमी दर समजला जात आहे हळदीच्या दरात वाढ होणार असल्याचे हे संकेत समजले जात आहेत.

खरेदीदाराने चढाओढीने बोली लावत ही हळद खरेदी केली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तानाजी पाटील बेंडे हे स्वतः बिटात हजर होते. त्यामुळे खरे दारात व शेतकऱ्यात उत्साहाचे वातावरण होते. मंगळवारी तब्बल सहा हजार कट्ट्यापेक्षा अधिक हळदीची आवक वसमतच्या मोंढयात होती. त्यामुळे वसमतचा मोंढा हळदीने गजबजून गेल्याचे पहावयास मिळाले. (तालुका प्रतिनिधी)

वसमत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तानाजी पाटील बेंडे याच्याशी सपर्क साधला असता त्यानी वसमत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डात हळदीला सर्वाधिक दर मिळत असतो. शेतकऱ्याच्या मालाला ज्यादा दर मिळावा. यासाठी सचालक मडळ सतत प्रयत्नशील असतात. मगळवारी खरेदीदार मोठ्या सख्येने उपस्थित होते. बाजारात हळदीचे दर वाढलेले आहेत. त्याचा परिणाम बिटात हळदीला वाढीव दर मिळण्यात झाला. शेतकऱ्यानी वसमतच्या मार्केट यार्डात हळद विक्रीसाठी आणावी असे आवाहन त्यानी यावेळी केले.

Agrowon, Dt. 12/03/2024

# बाजार समित्यांच्या अभ्यास समितीने अहवाल केला सादर

**ॲग्रोवन वृत्तसेवा**


**मुंबई :** राज्यातील पर्यायी बाजार व्यवस्था तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट अभ्यासगटाच्या शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणन मंत्री अब्दुल सत्तार, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह अन्य मंत्री यांच्या उपस्थितीत माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांनी अभ्यास गटांच्या शिफारशी सादर केल्या.

खासगी बाजार, थेट पणन परवाना, शेतकरी ग्राहक-बाजार, ई-व्यापार व्यासपीठ तयार करणे. कंत्राटी शेती, कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार व कृषी उत्पन्न बाजार समिती यांचा तुलनात्मक अभ्यासातील महत्त्वाच्या बाबी, किमान आधारभूत किमतीबाबत, कृषी पणन विभागाचे बळकटीकरण आणि पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद करणे. कृषी पणन व्यवस्थेत भविष्याचा वेध घेणे. या महत्त्वाच्या शिफारशी शेतकरी हित केंद्रबिंदू मानून अभ्यासगटाने सादर केल्या आहेत.

दैनिक आपला बळीराजा
जनहिताचा जागर..
12MAR2024

# पर्यायी बाजार व्यवस्था, दांगट समितीचा अहवाल शासनास सादर



मुंबई। प्रतिनिधी

राज्यातील पर्यायी बाजार व्यवस्था तसचे कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा अभ्यास करण्यासाठी गठीत केलेल्या माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट अभ्यासगटाच्या शिफारशी शासनास सादर करण्यात आल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पणन मंत्री अब्दुल सत्तार, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मंत्री मंडळातील अन्य मंत्री यांच्या उपस्थितीत माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांनी अभ्यास गटांच्या शिफारशी शासनास सादर केल्या. खाजगी बाजार, थेट पणन परवाना, शेतकरी ग्राहक-बाजार, ई-व्यापार व्यासपीठ तयार करणे. कंत्राटी शेती, कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार व कृषी उत्पन्न बाजार समिती यांचा तुलनात्मक अभ्यासातील महत्वाच्या बाबी, किमान आधारभूत किंमतीबाबत, कृषी पणन विभागाचे बळकटीकरण आणि पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करणे. कृषी पणन व्यवस्थेत भविष्याचा वेध घेणे. या महत्त्वाच्या शिफारशी शेतकरी हित केंद्रबिंदू मानून अभ्यासगटांने सादर केल्या आहेत.

# कांद्याचे ई-लिलाव सुरू करा

## कांदा प्रश्नावर अभ्यास समितीची सरकारकडे शिफारस

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : नाशिवंत शेतीमालासाठी ई-नाम अपयशी ठरल्याचे वास्तव असताना, मात्र कांद्याचे दर पडून मातीमोल होऊ नयेत यासाठी कांद्याचे ई-लिलाव सुरू करावेत, त्यासाठी केंद्र सरकारच्या ई-नाम किंवा ई-ट्रेडिंग योजनेची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस कांदा प्रश्नावर अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या सुनील पवार समितीने राज्य सरकारकडे केली आहे.

कांदा काढणीच्या हंगामात कांदा उत्पादक पट्ट्यातील बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आवक होते. परिणामी, मागणी व पुरवठ्याचे गणित कोलमडल्यामुळे दर पडतात आणि मोठा संघर्ष सुरू होतो. हा संघर्ष सरकारला डोकेदुखी ठरते. या संघर्षात सरकारला मध्यस्थी करावी लागते. प्रसंगी कांदा अनुदान जाहीर करावे लागते. हा सर्व संघर्ष टाळण्यासाठी ऑनलाइन लिलाव सुरू केले तर ते फायदेशीर ठरेल, असा कांदा समितीमधील अभ्यासकांचा दावा आहे.

राज्यातील ११८ बाजार समित्यांमध्ये ई-नाम व्यवहार सुरू आहेत. मात्र या व्यवहारांवर शेतकरी शंका उपस्थित करत आहेत. अनेक बाजार समित्यांमध्ये ई-नामवर लिलाव न होता. पारंपरिक लिलावाची माहिती नंतर ई-नाम पोर्टलवर कृत्रिमरीत्या (मॅन्युअली) भरली जात असल्याचे अनेक बाजार समित्यांमधील वास्तव आहे. मात्र अशास्थितीत ई-नाममुळे लिलाव प्रक्रिया पारदर्शक होईल. शेतकरी, अडते, व्यापाऱ्यांमध्ये समन्वय साधला जाईल. तसेच रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशी आशा समिती सदस्यांना असून, तशा शिफारशी त्यांनी केल्या आहे.



### काढणीच्या काळात निर्यात करा

राज्यात कांदा काढणीच्या हंगामात आणि प्रामुख्याने साठवणूक योग्य कांदा नसल्याच्या काळात कांदा सडून जाण्यापेक्षा किमान शेजारील देशांना कांदा निर्यात करण्याची परवानगी केंद्र सरकारने द्यावी. कांदा निर्यातीबाबत परिस्थितीनिहाय धोरण ठरवावे. दीर्घकालीन धोरण आखताना परदेशाची बाजारपेठ हातची जाऊ नये, याची काळजी घ्यावी. सध्या निर्यात बंदीमुळे आखाती देशांतील आपली हक्काची बाजारपेठ अन्य देशांनी काबीज केली आहे, असेही समितीने निरीक्षण नोंदविले आहे.

सकाळ

# राज्यात कांद्याचे ई-लिलाव करा

## सुनील पवार समितीची राज्याकडे महत्त्वपूर्ण शिफारस

**मार्केट यार्ड, ता. ५ :** कांद्याची कवडीमोल भावाने होणारी विक्री टाळण्यासाठी आणि स्पर्धात्मक भाव मिळण्यासाठी राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये कांद्याचे ई-लिलाव सुरू करावेत, त्यासाठी केंद्र सरकारच्या ई-नाम किंवा ई-ट्रेडिंग योजनेची अंमलबजावणी सुरू करावी, अशी महत्त्वाची शिफारस कांदा प्रश्नावर अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या सुनील पवार समितीने राज्य सरकारकडे केली आहे.

कांदा काढणीच्या हंगामात कांदा उत्पादक पट्ट्यातील बाजार समित्यांमध्ये बेसुमार आवक होते. शेतकऱ्यांकडे साठवणुकीची व्यवस्था नसते. कांदा सडून जाण्यापेक्षा मिळेल त्या किंमतीला विकावा आणि आर्थिक निकड भागवावी म्हणून शेतकरी कांद्याची विक्री करतात. मागणीच्या तुलनेत आवक वाढल्याच्या स्थितीचा व्यापारीही फायदा घेतात. त्यामुळे कांदा कवडीमोल होतो. या अनागोंदीच्या स्थितीत ई-नाम योजना फायद्याची ठरेल.

राज्यातील ११८ बाजार समित्यांमध्ये ई-नाम व्यवहार सुरू झाले आहेत. त्यासह अन्य बाजार समित्यांनी ई-नाम योजनेअंतर्गत कांदा खरेदी-विक्री व्यवहार करावेत. जेणेकरून देशाच्या अन्य भागातून मागणी वाढून दर स्थिर राहतील किंवा स्पर्धात्मक दर मिळतील. शिवाय ई-नाममुळे लिलाव प्रक्रिया पारदर्शक होईल. शेतकरी, अडते, व्यापाऱ्यांमध्ये समन्वय साधला जाईल, तसेच रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल, अशा शिफारसीही समितीने केल्या आहेत.

### निर्यातीतील अडथळे दूर करा

देशातून सर्वाधिक कांदा निर्यात बांगलादेशाला होते. मात्र सध्या निर्यात बंद आहे. बांगलादेशाने आयातकर लावला आहे. शिवाय रेल्वेने कांदा निर्यातीसाठी जास्तीच्या सुविधांची गरज आहे. नेपाळ, श्रीलंकेला आपला कांदा जातो; पण कोरोनानंतर ही निर्यात अडचणीत आली आहे. श्रीलंका आणि नेपाळची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे पाठविलेल्या मालाचे पैसे येण्याची भीती व्यापाऱ्यांना आहे. शिवाय शेजारील आणि मित्र देशांसोबत रुपयांत आर्थिक व्यवहार व्हावेत, अशी शिफारसही समितीने केली आहे.



### काढणीच्या काळात निर्यात करा

राज्यात कांदा काढणीच्या हंगामात आणि प्रामुख्याने साठवणूक योग्य कांदा नसल्याच्या काळात कांदा सडून जाण्यापेक्षा किमान शेजारील देशांना कांदा निर्यात करण्याची परवानगी केंद्र सरकारने द्यावी. कांदा निर्यातीबाबत परिस्थितीनिहाय धोरण ठरवावे. दीर्घकालीन धोरण आखताना परदेशाची बाजारपेठ हातची जाऊ नये, याची काळजी घ्यावी. सध्या निर्यात बंदीमुळे आखाती देशांतील आपली हक्काची बाजारपेठ अन्य देशांनी काबीज केली आहे, असेही समितीने निरीक्षण नोंदविले आहे.

Agrowon, Dt. 06/03/2024

# मुंबई बाजार समिती आंतरराष्ट्रीय घोषित करा

## दि फ्रुट व्हेजिटेबल मर्चंट्स असोसिएशनची मागणी; राज्यातून १२ हजार हरकती



**गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : नव्याने येऊ घातलेल्या पणन सुधारणांमध्ये मुंबई बाजार समितीला राष्ट्रीय नको तर आंतरराष्ट्रीय बाजार घोषित करावा आणि पणन कायद्यातून मुक्त करावा, अशी मागणी बाजार समितीमधील दि फ्रुट व्हेजिटेबल मर्चंट्स असोसिएशनने पणन संचालकांकडे सादर केलेल्या हरकती सूचनांद्वारे केली आहे. तर बाजार समित्या आणि बाजार घटकांकडून हरकती सूचना मागविण्यात आल्या होत्या. यानुसार राज्यातील शेतकरी, व्यापारी, हमाल, बाजार समित्या आणि लोकप्रतिनिधींनी १२ हजार हरकती आणि सूचना पणन संचालनालयाकडे पाठविल्या आहेत.

### शेतकऱ्यांना अधिकार राहणार नाहीत

पणन सुधारणांच्या विरोधात बाजार समित्यांनी आंदोलने देखील सुरू केली आहेत. बाजार समिती कायद्यातील कलम '१३ अ' व '१३ ब' मध्ये दुरुस्ती करून बाजार समितीचे संचालक मंडळ शासनाकडून नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. त्यामुळे बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक प्रक्रिया बंद होणार आहे. निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक असलेले सभासद, विकास संस्थांचे संचालक मंडळ, ग्रामपंचायत सदस्य यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार राहणार नाहीत. पर्यायाने शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार राहणार नाहीत व याचा परिणाम सहकार क्षेत्रावर होण्याची धोका लोकप्रतिनिधींनी व्यक्त केला आहे. या हरकतींची छाननी करण्यात येईल व त्यावर तीन सदस्यीय मंत्रिसमिती अहवाल तयार करणार आहे. तो अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवला जाणार आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ नुसार आणि २०१८चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ६४ अन्वये सुरू असलेले बदल करण्यात येणार आहे. यानुसार ज्या बाजार समित्यांमध्ये एकूण आवकेच्या ३० टक्के शेतमाल तीन किंवा जास्त राज्यातून होत असेल अशा बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजार समित्यांचा दर्जा देण्याची सुधारणा सुचविण्यात आली आहे. याची अंमलबजावणी झाल्यास या बाजार समित्यांवर सनदी अधिकारी किंवा पणन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली २१ शासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचे संचालक मंडळ असणार आहे. या सुधारणांना बाजार समित्यांनी विरोध केला आहे. मात्र मुंबई बाजार समितीने व व्यापारी संघटनांनी मुंबई बाजार समितीमध्ये ४० टक्क्यांपेक्षा अधिक शेतमाल परराज्यांतून, व्यापारी शेतमाल असतो. तर ३० टक्क्यांपेक्षा अधिक शेतमाल हा आयात शेतमाल आहे.

# राज्यातून रोज ४० कंटेनर केळीची निर्यात सुरू

ॲग्रोवन वृत्तसेवा दि. 06/03/2024



**जळगाव :** राज्यातून केळीची निर्यात वाढली आहे. सध्या रोज ४० कंटेनर (एक कंटेनर २० टन क्षमता) केळीची निर्यात सुरू आहे. निर्यातीच्या केळीला १५०० ते १७०० रुपये प्रतिक्विंटलचा दर आहे. सोलापुरातही प्रतिक्विंटल २००० ते २२०० रुपये दर आहे. केळीची काढणी वाढली असून आवक बऱ्यापैकी आहे. आंध्र प्रदेशातही मुबलक केळी आहे. तेथे केळीला १६०० ते १७०० रुपये प्रतिक्विंटलचा दर आहे. आंध्र प्रदेशातून रोज २० ते २२ कंटेनर केळीची निर्यात आखाती देशांत होत आहे.

सोलापुरातून रोज १८ ते १९ कंटेनर केळीची निर्यात होत आहे. खानदेशात नंदुरबारातून सर्वाधिक १० ते ११ कंटेनर केळीची निर्यात होत आहे. तर धुळे व जळगाव जिल्ह्यांत मिळून रोज ११ ते १२ कंटेनर केळी निर्यात होत आहे. सध्या खानदेशात केळीचे दर काहीसे टिकून आहेत. परंतु कमी दर्जाच्या केळीला १३०० ते १४०० रुपये प्रतिक्विंटलचा दर आहे. आगाप बागांमधून निर्यातक्षम केळीची आवक वाढली आहे. जळगाव जिल्ह्यात केळीची आवक सध्या कमी आहे. रावेर, यावल व मुक्ताईनगरात पुढे आवक वाढेल. यामुळे केळीची निर्यातही वाढेल. नंदुरबारातील शहादा येथून अधिकची केळी आखाती देशांत पाठविली जात आहेत. खानदेशात काही शेतकरी गट व निर्यातदार कंपन्या युरोपातही केळी निर्यातीसाठी प्रयत्न करीत आहेत. त्यासंबंधीची कार्यवाही सुरू असून, दरात पुढे किंचित वाढ होईल.

## आंध्रातील केळीला अडचण

आंध्र प्रदेशात केळीची आवक बऱ्यापैकी आहे. तेथून रोज १६ ते १७ कंटेनर केळी निर्यात होत आहे. परंतु तेथे उष्णता वाढल्याने केळीत टिकवणक्षमता नाही. तेथे तापमान वाढत असल्यामुळे निर्यातक्षम केळी कमी उपलब्ध होतील. यामुळे तेथे कार्यरत कंपन्या राज्यात निर्यातीसंबंधी केळीची खरेदी वाढवतील, असेही संकेत आहेत.

पुढारी




डाळिंब निर्यातीला हिरवा कंदील दाखविताना राजेश अग्रवाल, संजय कदम व अन्य मान्यवर.

# अमेरिकेस प्रथमच समुद्रमार्गे डाळिंब निर्यात

## पणन मंडळाच्या सुविधेचा वापरातील कंटेनर रवाना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मुंबईतील वाशी येथील विकिरण सुविधेचा वापर करून अमेरिकेच्या नेवार्क पोर्टकडे चार किलो पॅकिंगमध्ये एकूण ४ हजार २५८ बॉक्सेसमधून १४ टन डाळिंब प्रथमच समुद्रमार्गे बुधवारी (दि.२८) जेएनपीटी बंदरातून रवाना झाले. या निर्यातीनंतर अमेरिकेतील मोठी बाजारपेठ भारतासाठी खुली झाल्याने शेतकऱ्यांना अधिक फायदा होण्याचा विश्वास केंद्रीय व्यापार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव राजेश अग्रवाल यांनी या वेळी व्यक्त केला.

अमेरिकेचे निरीक्षक डॉ. लुईस हे कृषी पणन मंडळाच्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावर डाळिंब तपासणीसाठी जानेवारी ते मार्च २०२४ या हंगामासाठी आलेले आहेत.

राजेश अग्रवाल यांनी डाळिंबाच्या कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला. या वेळी अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, अपेडाचे दिल्लीतील महासंचालक विनीता सुधांशु, अपेडा मुंबईचे उप महासंचालक प्रशांत वाघमारे, राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्थेचे (एन.पी.पी.ओ.) अधिकारी डॉ. ब्रिजेश मिश्रा, अमेरिका दुतावासाचे मायकेल श्रुडर आणि अमेरिकन निरीक्षक एल्म्स रायनॉन, डॉ. लुईस फेलीसियानो, पणन मंडळाचे सहायक सरव्यवस्थापक तथा विभागप्रमुख सतीश वाघमोडे, निर्यात व्यवस्थापक सतीश वराडे व अन्य मान्यवर कंटेनर रवाना होताना उपस्थित होते.

"अमेरिकेतील कॅलिफोर्निया डाळिंबाच्या जातीपेक्षा भारतीय डाळिंबाला तेथे अधिक मागणी आहे. त्यातून निर्यातीद्वारे अमेरिकेच्या बाजारात भारतीय डाळिंबाचा वाटा वाढण्यासाठी प्रथमच समुद्रमार्गे डाळिंब निर्यात ही एक महत्त्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. त्यातून भारतीय शेतकरी अमेरिकेची डाळिंबाची अत्यंत शाश्वत व मोठी बाजारपेठ काबीज करून अधिक फायदा मिळवतील, असा विश्वास आहे.

**- संजय कदम,**

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ.

लोकसत्ता, दि. 04/03/2024

# राज्यात फक्त तीनच कांदा प्रक्रिया उद्योग


**दत्ता जाधव, लोकसत्ता**

**पुणे :** महाराष्ट्र कांदा उत्पादनात देशात आघाडीवर आहे. देशाच्या एकूण कांदा उत्पादनात राज्याचा वाटा ५० टक्क्यांहून जास्त आहे. तरीही राज्यात फक्त तीनच कांदा प्रक्रिया उद्योग आहेत.

उलट गुजरात चौथ्या क्रमांकावर असूनही गुजरातमध्ये शंभरहून जास्त प्रक्रिया प्रकल्प आहेत. कांद्या प्रक्रियेबाबत राज्यात मोठी उदासीनता आहे. कृषी विभागाकडूनही ठोस प्रयत्न होताना दिसत नाहीत. त्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

२०२२-२३मध्ये महाराष्ट्रात १३५ लाख टन, मध्य प्रदेशात १५१ लाख टन, कर्नाटकात १३५ लाख टन आणि गुजरातमध्ये ४१ लाख टन कांदा उत्पादन झाले आहे. अपवादवगळता महाराष्ट्र उत्पादनात सातत्याने आघाडीवर असतो. तरीही राज्यात फक्त तीनच कांदा प्रक्रिया उद्योग सुरू आहेत. त्यातही जळगाव येथील जैन फूड्स उद्योग कार्यक्षमपणे सुरू आहे.

याउलट गुजरातमधील भावनगर जिल्ह्यात महुआ येथे सुमारे शंभर कांदा प्रक्रिया उद्योग आहेत. त्यातही प्रामुख्याने कांदा निर्जलीकरणाला प्राधान्य दिले जात आहे. महुआ परिसरातील राजुरा, ऊना, तळोजा या भागातही प्रक्रिया उद्योग उभारले जात आहेत.



## नुकसान टाळण्यासाठी पीक बदलाची गरज

राज्यात नाशिक, नगर, पुणे, सोलापूर, धुळे, जळगाव, बीड, छत्रपती संभाजीनगर, बुलडाणा, धाराशिव आणि सातारा या जिल्ह्यांत प्रामुख्याने कांद्याचे उत्पादन होते. त्यापैकी खरीप कांदा धुळे, सोलापूर, सातारा आणि धाराशिव जिल्ह्यांत होतो. उशिराचा खरीप कांदा नाशिक, जळगाव, नगर, सोलापूर, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यांत घेतला जातो. राज्यात दहा वर्षांत कांदा लागवड क्षेत्र दुप्पट झाले आहे. त्या तुलनेत देशांतर्गत मागणीत घट झाली आहे. पुरेशी निर्यात होत नाही आणि प्रक्रियाही होत नाही. त्यामुळे कांदा मातीमोल होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्यापेक्षा कांदाउत्पादक पट्ट्यातील शेतकऱ्यांना कांदा लागवड कमी करून त्याऐवजी दुसरे पीक घ्यावे, असा सल्लाही समितीने दिला आहे.

## प्रक्रिया उद्योगाला मोठी संधी

**कांद्यावर प्रक्रिया करून फ्लेक्स, पावडर, लोणचे, तेल, व्हिनेगर, वाईन, सॉस आदींचे उत्पादन करणे सहजशक्य आहे. शिवाय केवळ पाच कोटी रुपयांत उद्योग सुरू होऊ शकतो. तरीही विशेषकरून नाशिक परिसरात कांदा प्रक्रिया उद्योग वाढीस लागला नाही. पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पामधून (स्मार्ट) कोट्यवधी रुपये खर्च होत आहेत; पण या योजनांच्या माध्यमातूनही कांदा प्रक्रिया उद्योग उभे राहताना दिसत नाहीत.**

सकाळ



नाशिक : मिलेट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ॲड. नितीन ठाकरे, एस. वाय. पुरी, संभाजी ठाकूर, शुभदा जगदाळे आदी.

# निरोगी आयुष्यासाठी पौष्टिक तृणधान्यांची गरज

## ॲड. नितीन ठाकरे : कृषी पणन विभागाच्या मिलेट महोत्सवाचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १ : धावपळीच्या जीवनशैलीमुळे उद्‍भवणाऱ्या आजारांना दूर ठेवण्यासाठी आहारात तृणधान्याचा वापर वाढायला हवा. या आहारामुळे शरीर सशक्त बनते. पौष्टिक तृणधान्य ही काळाची गरज असून त्याचा सर्वांनी नियमित वापर करावा, असे आवाहन मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.

राज्य कृषी पणन मंडळ पुणे, विभागीय कार्यालय नाशिक यांच्या सहकार्याने १ ते ३ मार्चदरम्यान मविप्र संस्थेच्या उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात मिलेट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन शुक्रवारी (ता. १) ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते झाले. या वेळी कृषी पणन मंडळाचे एस. वाय. पुरी, विभागीय कृषी उपसंचालक संभाजी ठाकूर, मिसेस इंडिया इंटरनॅशनल शुभदा जगदाळे, आदिवासी विकास विभागाचे प्रताप पाडवी, मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. अशोक पिंगळे, डॉ. विलास देशमुख, डॉ. भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव, पणन मंडळ विभागीय व्यवस्थापक बी. सी. देशमुख, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बापूसाहेब भाकरे, श्याम पाटील उपस्थित होते. येत्या रविवार (ता. ३) पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत मिलेट महोत्सव सर्वांसाठी खुला असणार आहे. यामध्ये उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपलब्ध असून तृणधान्यापासून बनविलेले पदार्थ, राळा, ज्वारी, बाजरी, सावा, कोद्रा, बर्टी, वरई, हिरवी पिवळी भगर, थालीपीठ पराठा व मिक्स पीठ याचे प्रदर्शन व विक्री सुरू आहे. महोत्सव यशस्वितेसाठी पणन मंत्री अब्दुल सत्तार, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकचे हेमंत अत्तरदे, सचिन पाटील, श्यामराव पाटील, विलास सोनवणे, आनंद शुक्ल, विशाल पाटोळे, दिगंबर शिंदे, महेश वसईकर, सनी काटे यांनी परिश्रम घेतले. वृषाली गोडसे यांनी सूत्रसंचालन केले. बी. सी. देशमुख यांनी आभार मानले.

### ज्वारी कुल्फी अन् तृणधान्याचा इडली डोसा

**मिलेट महोत्सवात सहभागी बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांनी ३७ स्टॉल उभारले आहेत. यात अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीन्यपूर्ण उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे मविप्र संस्थेच्या कृषी महाविद्यालयाने 'ज्वारी' पासून तयार केलेली कुल्फी ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे.**



नाशिक : स्टॉलची पाहणी करताना मान्यवर.

पुण्य नगरी

# सांगोल्यातील डाळिंबे समुद्रमार्गे अमेरिकेला

## १२.६ टनाची खेप रवाना; 'अपेडा'चा उपक्रम

**मुंबई** : महाराष्ट्रातील सांगोला येथील शेतकऱ्यांनी पिकवलेल्या डाळिंबांच्या ४ हजार २०० पेट्या कृषी आणि प्रक्रियाकृत खाद्य उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाच्या (अपेडा) झेंड्याखाली समुद्रमार्गे अमेरिकेला रवाना झाल्या. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव राजेश अग्रवाल आणि अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव यांनी डाळिंबाच्या या प्रायोगिक तत्त्वावरील व्यावसायिक खेपेस हिरवा झेंडा दाखवला.

वाशीतील आयएफसी सुविधा, राज्य कृषी विपणन मंडळ येथील आयएनआय फार्म्सद्वारे ही १२.६ टनाची खेप पाठवण्यात आली. महाराष्ट्र राज्य कृषी विपणन मंडळ (एमएसएएमबी), प्रादेशिक वनस्पती विलगीकरण केंद्र, राज्य कृषी विभाग, एनआरसी डाळिंब, अमेरिकन वाणिज्य दूतावास आणि आयएनआय फार्म्सचे मान्यवर या सोहळ्याला उपस्थित होते.

अपेडाने गेल्या वर्षी तांत्रिक भागीदार म्हणून 'आयसीएआर-एनआरसी डाळिंब' यांच्या सहकार्याने किरणोत्सर्ग प्रक्रिया आणि स्थिर चाचणीसह डाळिंबाची हवाई खेप यशस्वीरीत्या पाठवली होती. त्या प्रयोगानंतर, अपेडाने भारतीय डाळिंबाच्या संभाव्य बाजारपेठेसाठी सागरी व्यापार संबंधाच्या माध्यमातून डाळिंब पाठवण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. अपेडाने २०२२-२३ मध्ये संयुक्त अरब अमिराती, बांगलादेश, नेपाळ, नेदरलँड्स, सौदी अरेबिया,



श्रीलंका, थायलंड, बहरीन आणि ओमानला ५८.३६ दशलक्ष अमेरीकी डॉलर्स किमतीच्या डाळिंबाची निर्यात केली आहे.

अपेडा नोंदणीकृत आयएनआय फार्म्सने या प्रायोगिक हवाई खेप, सागरी खेप आणि सागरी कंटेनरचे कार्यान्वयन केले आहे. ही कंपनी भारतातील फळे आणि भाज्यांचे सर्वोच्च निर्यातदार असून, त्यांची उत्पादने जगभरातील २५ हून अधिक देशांमध्ये निर्यात केली जात आहेत. या कंपनीने गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक बाजारपेठेतील कठोर मानकांची पूर्तता करण्यासाठी, डाळिंबाची गुणवत्ता आणि साठवण वाढवण्याकरता व्यापक प्रयत्न केले आहेत. एग्रोस्टार समूहाचा एक भाग म्हणून आयएनआय फार्म्सने महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान या राज्यांमधील शेतकऱ्यांसोबत थेट काम करून डाळिंबासाठी मूल्य साखळी स्थापन केली आहे.

### भारतात सर्वाधिक उत्पादन

भारत जगातील सर्वात मोठ्या डाळिंब उत्पादकांपैकी एक आहे आणि आता जगातील डाळिंब निर्यातीत आघाडीवर असलेल्या देशांपैकी एक होण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. मऊ मांसल बिया, कमी आम्लता आणि आकर्षक रंगासह गुणवत्तेच्या दृष्टीने डाळिंबाच्या काही सर्वोत्तम जातींचे उत्पादन भारत करतो. केशरी डाळिंब हे जगभरातील सर्वोत्तम जातीपैकी एक मानले जाते. गेल्या दशकात भारताने डाळिंबाचे क्षेत्रफळ तसेच उत्पादन वाढवले आहे आणि निर्यातीत वाढ झाली आहे. भारतात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, राजस्थान आणि आंध्र प्रदेश ही डाळिंब उत्पादन करणारी प्रमुख राज्ये आहेत. यात महाराष्ट्राचा वाटा ५० टक्क्यांहून अधिक आहे.

Pune Edition
Mar 2, 2024 Page No. 14
Powered by: erelego.com

पुढारी

# आहारात वाढवा पौष्टिक तृणधान्य

## अ‍ॅड. ठाकरे : कृषी पणन विभागामार्फत तृणधान्य महोत्सव

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

धावपळीच्या जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या आजारांना दूर ठेवण्यासाठी आहारात तृणधान्याचा वापर वाढायला हवा. या आहारामुळे शरीर सशक्त बनते. पौष्टिक तृणधान्य ही काळाची गरज असून, त्याचा सर्वांनी नियमित वापर करावा, असे आवाहन मविप्र शिक्षण संस्थेचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांनी केले.



**नाशिक : तृणधान्य महोत्सव उद्घाटनप्रसंगी बोलताना मविप्रचे सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे. व्यासपीठावर एस. वाय. पुरी, संभाजी ठाकूर, मिसेस इंडिया इंटरनॅशनल शुभदा जगदाळे, प्रताप पाडवी, बी. सी. देशमुख आदी.**

राज्य कृषी पणन मंडळ पुणे, विभागीय कार्यालय नाशिक यांच्या सहकार्याने दि. १ ते ३ मार्चदरम्यान उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात मिलेट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन शुक्रवारी (दि.१) अ‍ॅड. ठाकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी कृषी पणन मंडळाचे एस. वाय. पुरी, विभागीय कृषी उपसंचालक संभाजी ठाकूर, मिसेस इंडिया इंटरनॅशनल शुभदा जगदाळे, आदिवासी विकास विभागाचे प्रताप पाडवी, मविप्र कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब भाकरे, पणन मंडळ विभागीय व्यवस्थापक बी. सी. देशमुख, श्याम पाटील आदी उपस्थित होते. येत्या रविवारपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ८ पर्यंत मिलेट महोत्सव सर्वांसाठी खुला असणार आहे. यामध्ये उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपलब्ध असून तृणधान्यापासून बनविलेले पदार्थ, राळा, ज्वारी, बाजरी, सावा, कोद्रा, बर्टी, वरई, हिरवी पिवळी भगर, थालीपीठ पराठा व मिक्स पीठ याचे प्रदर्शन व विक्री सुरू आहे.

### अन् तृणधान्याचा इडली डोसा

महोत्सवात सहभागी बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांनी ३७ स्टॉल उभारले आहेत. यात ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. 'मविप्र'च्या कृषी महाविद्यालयाने ज्वारीपासून तयार केलेली कुल्फी ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहे.

Nashik Edition
Mar 2, 2024 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

Maharashtra Times, Dt. 02/03/2024

मटा अँकर नाशिककर खवय्यांची पसंती; कृषी पणन विभागाच्या मिलेट्स महोत्सवास प्रारंभ

# ज्वारीची कुल्फी अन् भगरीच्या डोशाची चलती...

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

'जंकफूड' आरोग्यास अपायकारक असल्याचे माहिती असूनदेखील अनेकांची पावले त्याकडे वळतात. पण, या 'जंकफूड'ला रुचकर पर्याय उपलब्ध करून देता आल्यास खवय्ये नक्कीच तृणधान्यांकडे आकर्षित होतात, हे शुक्रवारी कृषी विभागाच्या मिलेट्स महोत्सवात दिसून आले.

या महोत्सवात उपलब्ध असलेली ज्वारीची कुल्फी, भगरीचा डोसा, बाजरीच्या लाह्या अन् रागीची बिस्किटे असे असंख्य आरोग्यदायी खाद्यपदार्थ खवय्यांच्या पसंतीस उतरल्याचे चित्र पाहायला मिळाले. महाराष्ट्र कृषी पणन विभागामार्फत तीनदिवसीय मिलेट्स महोत्सवाचे उद्घाटन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. मविप्रच्या उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.


सतीश काळे

### तृणधान्याचे ३७ स्टॉल्स

मिलेट्स महोत्सवात सहभागी बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांनी ३७ स्टॉल्स उभारले आहेत. त्यात अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स इत्यादी नावीन्यपूर्ण उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे मविप्र संस्थेच्या कृषी महाविद्यालयाने 'ज्वारी'पासून तयार केलेली कुल्फी ग्राहकांच्या पसंतीस उतरली आहे.

कृषी पणन मंडळाचे एस. वाय. पुरी, विभागीय कृषी उपसंचालक संभाजी ठाकूर, मिसेस इंडिया इंटरनॅशनल शुभदा जगदाळे, आदिवासी विकास विभागाचे प्रताप पाडवी, मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. अशोक पिंगळे, डॉ. विलास देशमुख, डॉ. भास्कर ढोके, डॉ. नितीन जाधव, मविप्र कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब भाकरे, पणन मंडळ विभागीय व्यवस्थापक बी. सी. देशमुख, श्याम पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी संवादादरम्यान ॲड. ठाकरे म्हणाले, की तृणधान्यांचा आहारात समावेश करणे अगत्याचे आहे. दगदगीच्या जीवनशैलीमुळे अनेकांना आजारांना सामोरे जावे लागते. मात्र, तृणधान्य हे पौष्टिक आणि निसर्गास अनुकूल असल्याने त्याचा आहारात समावेश करायला हवा. राज्य कृषी पणन मंडळ पुणे, विभागीय कार्यालय नाशिकच्या सहकार्याने रविवार (दि. ३)पर्यंत सकाळी दहा ते रात्री आठ वाजेपर्यंत मिलेट महोत्सव सर्वांसाठी खुला राहणार आहे.

महोत्सवात उत्पादक ते ग्राहक अशी थेट विक्री व्यवस्था असून, तृणधान्यांपासून बनविलेले पदार्थ, राळा, ज्वारी, बाजरी, सावा, कोद्रा, बर्टी, वरई, हिरवी-पिवळी भगर, थालिपीठ-पराठा व मिक्स पीठ यांचे प्रदर्शन व विक्री सुरू आहे.

पणनमंत्री अब्दुल सत्तार, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकचे हेमंत अत्तरदे, सचिन पाटील, श्यामराव पाटील, विलास सोनवणे, आनंद शुक्ल, विशाल पाटोळे, दिगंबर शिंदे, महेश वसईकर, सनी काटे महोत्सव यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहेत. वृषाली गोडसे यांनी सूत्रसंचालन केले. बी. सी. देशमुख यांनी आभार मानले.

लोकमत

महाराष्ट्रातून १४ टन डाळिंबाची निर्यात

# महाराष्ट्राचा 'भगवा' अमेरिकेत फडकला

लोकमत विशेष

नितीन चौधरी
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेतकऱ्यांनी 'भगवा' आता थेट अमेरिकेत फडकावला आहे. अर्थात हा भगवा डाळिंब आहे. राज्यातून पहिल्यांदाच अमेरिकेत डाळिंब निर्यात करण्यात आले आहे. यानिमित्ताने शेतकऱ्यांना किमान २५ ते ५० टक्के ज्यादा दर मिळण्याची आशा आहे. नाशिक, फलटण, सांगोला परिसरातून १४ टन डाळिंब अर्थात ४,२५८ बॉक्स जहाजातून अमेरिकेत पाठविण्यात आले.



भगवा डाळिंबाची प्रत आणि चव वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे यापूर्वी संयुक्त अरब अमिराती, बांगलादेश, नेपाळ, नेदरलँड, सौदी अरेबिया, श्रीलंका, थायलंड, बहारिन व ओमान यासारख्या देशांमध्ये निर्यात सुरू आहे. या डाळिंबाला अमेरिकेची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या वर्षी जुलैमध्ये चाचणी घेण्यात आली.

## ५० ते ५५ दिवस टिकतात डाळिंब

भगवा ही डाळिंबाची जात काढणीनंतर ५० ते ५५ दिवस टिकते. त्यामुळेच समुद्र मार्गाने पाठवण्यासाठी टिकवण क्षमता महत्त्वाची ठरली आहे. मुंबईतील बंदरातून अमेरिकेत पोहोचण्यासाठी ३७ दिवसांचा कालावधी लागणार असून त्यानंतरही सुमारे वीस दिवस हे डाळिंब अमेरिकेतील बाजारात टिकून राहू शकणार आहे. त्यामुळेच ही निर्यात समुद्रामार्गे करण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संचालक संजय कदम यांनी सांगितले. हवाई भाडे समुद्र मार्गापेक्षा किमान सहा ते सात पट जास्त झाले, हेही एक कारण त्यामागे आहे.

## कॅलिफोर्नियात मोठी मागणी

अमेरिका डाळिंबांसाठी सर्वांत मोठी बाजारपेठ आहे. अमेरिकेतीलच कॅलिफोर्नियातील डाळिंब मोठ्या प्रमाणावर विकले जातात, तसेच स्पेन, इजिप्त, अफगाणिस्तानातून अमेरिकेत डाळिंब विक्रीसाठी येतात. मात्र, भारतातील डाळिंब पहिल्यांदाच अमेरिकेतील बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत.

देशदूत

# पौष्टिक तृणधान्य काळाची गरज : ॲड. ठाकरे

## तीन दिवसीय तृणधान्य महोत्सवाचे उद्घाटन

**नाशिक** । धावपळीच्या जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या आजारांना दूर ठेवण्यासाठी आहारात तृणधान्याचा वापर वाढायला हवा. या आहारामुळे शरीर सशक्त बनते. पौष्टिक तृणधान्य ही काळाची गरज असून त्याचा सर्वांनी नियमित वापर करावा, असे आवाहन मविप्र समाज शिक्षण संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.

राज्य कृषी पणन मंडळ पुणे, विभागीय कार्यालय नाशिक यांच्या सहकार्याने १ ते ३ मार्चदरम्यान उदाजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात मिलेट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन आज शुक्रवारी ॲड.नितीन ठाकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी कृषी पणन मंडळाचे एस.वाय.पुरी, विभागीय कृषी उपसंचालक संभाजी ठाकूर, मिसेस इंडिया इंटरनॅशनल शुभदा जगदाळे, आदिवासी विकास विभागाचे प्रताप पाडवी,




मविप्रचे शिक्षणाधिकारी डॉ. अशोक पिंगळे, डॉ. विलास देशमुख, डॉ. भास्कर ढोके, डॉ.नितीन जाधव,मविप्र कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बापूसाहेब भाकरे, पणन मंडळ विभागीय व्यवस्थापक बी. सी. देशमुख, श्याम पाटील उपस्थित होते.

रविवारपर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत मिलेट महोत्सव सर्वांसाठी खुला असणार आहे. यामध्ये उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपलब्ध असून तृणधान्यापासून बनविलेले पदार्थ, राळा, ज्वारी, बाजरी, सावा, कोद्रा, बर्टी, वरई, हिरवी पिवळी भगर, थालीपीठ पराठा व मिक्स पीठ याचे प्रदर्शन व विक्री सुरु आहे. महोत्सव यशस्वीतेसाठी पणन मंत्री अब्दुल सत्तार, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकचे हेमंत अत्तरदे, सचिन पाटील, शामराव पाटील, विलास सोनवणे, आनंद शुक्ल, विशाल पाटोळे, दिगंबर शिंदे, महेश वसईकर, सनी काटे यांनी परिश्रम घेतले. वृषाली गोडसे यांनी सूत्रसंचालन केले.बी.सी.देशमुख यांनी आभार मानले.

मिलेट महोत्सवात सहभागी बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांनी ३७ स्टॉल उभारले आहेत. यात अस्सल ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व कृषी महाविद्यालयाने 'ज्वारी'पासून तयार केलेली कुल्फी या प्रमाणे वेगवेगळ्या प्रकारच्या तृणधान्यच्या वस्तूंपासून बनविलेले पदार्थांची विक्री या ठिकाणी होत आहे.

# अमेरिकेला डाळिंबाची निर्यात पुन्हा सुरू

ॲग्रोवन वृत्तसेवा दि. 02/03/2024




**वाशी, नवी मुंबई : अमेरिकेच्या डाळिंब निर्यातीच्या कंटेनरला अतिरिक्त सचिव राजेश अग्रवाल यांनी बुधवारी इतर मान्यवरांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवला.**

पुणे : पाच वर्षांपूर्वी डाळिंबामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव आढळल्याने अमेरिकेला बंद असलेली डाळिंबाची निर्यात पुन्हा सुरू झाली. पणन मंडळाच्या वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रावरून १४ टन डाळिंबाची यशस्वी निर्यात झाली आहे.

पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम म्हणाले, की फळमाशीच्या प्रादुर्भाव आढळल्यामुळे अमेरिकेने भारतातून डाळिंब आयातीस बंदी घातली होती. त्यामुळे गेली ५ वर्षे अमेरिकेस डाळिंब निर्यात होऊ शकली नव्हती. ही बंदी उठविण्याबाबत अपेडा व एन.पी.पी.ओ. भारत सरकार यांनी संयुक्तरित्या अमेरिकेच्या कृषी विभागाशी चर्चा केली होती. त्यानुसार २०२२ पासून अमेरिकेने निर्यातबंदी उठवली, मात्र त्यासाठी काही नियम व अटी घातल्या होत्या. यात माईट वॉश, सोडीयम हायपोक्लोराईड प्रक्रिया, वॉशिंग-ड्राईंग इ. प्रक्रिया करून त्यांनी निश्चित केलेल्या मानांकानुसारच्या बॉक्समध्ये पॅकिंग करून डाळिंबावर विकिरण प्रक्रिया करणे या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला. त्यानुसार निर्यातदारांसमवेत निर्यातीचे नियोजन करण्यात आले होते.

नव्या नियमावलीनुसार चाचणीसाठी जुलै २०२३ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर डाळिंबाची पहिली शिपमेंट विमानमार्गे पणन मंडळाच्या वाशी येथील विकिरण सुविधा केंद्रावरून पाठविण्यात आली होती. या यशस्वी निर्यातीनंतर अमेरिकेचे निरीक्षक डॉ. लुईस पणन मंडळाच्या वाशी विकिरण सुविधेची तपासणी आणि चाचण्यांसाठी आले. जानेवारी ते मार्च या हंगामासाठी या चाचण्या होणार असून, पहिल्या समुद्रमार्गे डाळिंब कंटेनरसाठी चाचण्या आणि पॅकिंग करण्यात आले. प्रतवारी करून, ४ किलोच्या बॉक्समध्ये भरून विकिरण प्रक्रिया करण्यात आली. ४२५८ बॉक्समधून १४ टन डाळिंब अमेरिकेच्या नेवार्क पोर्टसाठी बुधवारी (ता. २८) नाव्हा शेवा बंदरावरून रवाना झाली.

भारत सरकारचे अतिरिक्त सचिव राजेश अग्रवाल यांनी कंटेनरला हिरवा झेंडा दाखवला. अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव, कृषी पणनचे कार्यकारी संचालक, संजय कदम, अपेडाच्या महासंचालक विनीता सुधांशु, मुंबईचे उपसरव्यवस्थापक प्रशांत वाघमारे, अमेरिका दूतावासाचे मायकेल श्रुडर, एल्म्स रायनॉन उपस्थित होते.

*भारतीय डाळिंबाला अमेरिकेत विशेष मागणी आहे. काही दिवसांपूर्वी बंदी असलेली निर्यात आता विशेष प्रोटोकॉलनुसार सुरू झाली आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया डाळिंबाच्या जातीपेक्षा भारतीय डाळिंबाच्या जातीला जास्त मागणी असल्याने अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय डाळिंबाचा मोठा हिस्सा असणार आहे. यासाठी अपेडा, एन.पी.पी.ओ. पणन मंडळ आणि निर्यातदारांच्या आणि अमेरिका सरकारच्या सहकार्याने महत्त्वाची पावले टाकली जात आहेत.*

**– राजेश अग्रवाल,**
*भारत सरकारचे अतिरिक्त सचिव*

*अमेरिकेस भारतातून पहिल्यांदाच समुद्रमार्गे डाळिंबाचा कंटेनर निर्यात करण्यात आल्याने ही एक महत्त्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. भारतीय डाळिंबांनी अत्यंत शाश्वत व मोठी अमेरिकन बाजारपेठ काबीज केली जात असून डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे.*

**– संजय कदम,**
*कार्यकारी संचालक, पणन मंडळ*

लोकमत

मिलेट महोत्सव २०२४ : दोन दिवसीय महोत्सव पाहण्याची संधी

# ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स ठरले आकर्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : संयुक्त राष्ट्रसंघाने हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे विभागीय कार्यालय नाशिक यांच्या वतीने मिलेट अर्थात तृणधान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, शुक्रवारी या महोत्सवाचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.

ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली-मिक्स, रागीचा डोसा मिक्स यासारखी नावीन्यपूर्ण मिलेट उत्पादने मिलेट महोत्सवाची आकर्षणे ठरले आहेत. यानिमित्ताने निरोगी आरोग्याचा संदेश देण्यात आला आहे.



मिलेट महोत्सवाचे उद्‌घाटन करताना मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे. समवेत एस. वाय. पुरी, संभाजी ठाकूर, डॉ. शुभदा जगदाळे, अशोक पिंगळे, प्राचार्य विलास देशमुख आदी.

शुक्रवार (दि.१) ते रविवार (दि.३) तीनदिवसीय कालावधीत सकाळी नऊ ते रात्री नऊ या वेळेत हा महोत्सव गंगापूर रोड येथील उदोजी महाराज शैक्षणिक वारसा संग्रहालयात सुरू झाला आहे. शुक्रवारी झालेल्या महोत्सवाच्या उद्‌घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, तसेच व्यासपीठावर प्राचार्य डॉ. बी. डी भाकरे, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक एस. वाय. पुरी, विभागीय कृषी उपसंचालक संभाजी ठाकूर, मिसेस इंडिया इंटरनॅशनल डॉ. शुभदा जगदाळे, अशोक पिंगळे, प्राचार्य विलास देशमुख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

तृणधान्याचे जीवनातील महत्त्व आणि निरोगी आयुष्यासाठी त्याची उपयुक्तता मनोगतातून सरचिटणीस ठाकरे यांनी व्यक्त केली, तर नववर्षाची सुरुवात कृषी पणन मंडळाने आरोग्यपूर्ण अशा या पहिल्या मिलेट (तृणधान्य) महोत्सवाद्वारे केलेली असून, ग्राहकांनी संधीचा लाभ घेण्याचे आवाहन उपसरव्यवस्थापक पुरी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली गोडसे यांनी केले, तर आभार बी.सी. देशमुख यांनी मानले.

## ३७ स्टॉल आणि विविध कार्यक्रम

- विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्टअप कंपन्यांचा सहभाग आहे.
- **३७ स्टॉल लावण्यात आले आहेत. स्टॉलवर तृणधान्यापासून तयार केलेले पदार्थ, वस्तू विक्रीला ठेवण्यात आल्या आहेत.**
- मिलेट उत्पादन, मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्त्व याविषयी तज्ज्ञांची व्याख्याने, खरेदीदार-विक्रेते संमेलन यांचा समावेश आहे.